।। सा हि श्रीरमृतां सताम् ।।

आयुर्वेद शिक्षण मंडळाचे

# अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय, पुणे

१९३६ पासून

जा.क्र.: ६२९/२०१९ दिनांक : १६/११/२०१९

## जागतिक मधुमेह दिन 14 नोव्हेंबर 2019 अहवाल

अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय आणि रुग्णालय पुणे यांच्या वतीने जागतिक मधुमेह दिन साजरा करण्याविषयी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये प्राधान्याने 'जीवनशैली आणि मधुमेह' या विषयावर माहिती पर व्याख्यान तसेच रुग्णालयावर व परिसरामध्ये मधुमेह निदानासाठी बीएसएल (R) तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

प्रा. डॉ. सौ. कीर्ती भाटी (विभाग प्रमुख, स्वस्थवृत्त विभाग, भारती विद्यापीठ आयुर्वेद महाविद्यालय, पुणे) यांनी 'जीवनशैली आणि मधुमेह' या विषयावर परिसरातील नागरिक रुग्ण तसेच विद्यार्थी यांना उत्कृष्ट माहिती आपल्या व्याख्यानाद्वारे दिली. याप्रसंगी डॉ. सौ. मानसी देशपांडे (विभाग प्रमुख, द्रव्यगुण विभाग, भारती विद्यापीठ आयुर्वेद महाविद्यालय, पुणे) या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. सदर व्याख्यानाच्या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भीम गायकवाड अध्यक्ष म्हणून उपस्थित होते, तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मनोज चौधरी यांनी केले.

यानिमित्त झालेल्या मधुमेह शर्करा तपासणी (BSL Random) शिबिराचे संचालन डॉ. सौ. अस्मिता कुबेर (विभाग प्रमुख, रोगनिदान विभाग, अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय, पुणे) यांनी केले. तसेच राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. सौ. अपर्णा सोले यांनी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकामार्फत शिबिरास सर्वतोपरी सहकार्य केले. या तपासणी शिबिरामध्ये सुमारे 50 पेक्षा अधिक रुग्णांनी लाभ घेतला या तपासणीदरम्यान मधुमेह तपासणी असणाऱ्या रुग्णांना पुढील उपचारासाठी महाविद्यालयाच्या रुग्णालयातील संबंधित विभागांमध्ये उपचारांविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

या दिनानिमित्त आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयाचे व रुग्णालयाचे सर्व कर्मचारी तसेच अनुभवी तज्ञ डॉक्टरांनी आपले योगदान दिले. या कार्यक्रमांचे आयोजन करण्यासाठी आयुर्वेद शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. म. ह. परांजपे यांनी मार्गदर्शन केले, तसेच संस्थेचे सी.ई.ओ. मा. श्री. सुनील बहिरट सरांनी सर्वतोपरी मदत केली.

आपले विश्वासू,

A.P. Sole

डॉ. अपर्णा सोले

कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना युनिट,

डॉ. भीम गायकवाड

प्राचार्य,

अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय, पुणे

Ashtang Ayurved Mahavidyalaya Pune-30

महाविद्यालय फोन : ०२० २४४३ २५०८ | फॅक्स: ०२०-२४४३७९१० | रुग्णालय फोन : ०२० २४४३ ००७५ | ई-मेल-asmashtangayu@gmail.com
2032/B/2, सदाशिव पेठ, के. वै. ह. बा. परांजपे चौक, विजयनगर कॉलनी, पुणे-४११०३०
( संलग्न : महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक- कॉलेज कोड नं. ३२०१ )

## जागतिक मधुमेह दिन - दि. १४ नोव्हेम्बर २०१९ - अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय आणि रुग्णालय, पुणे













